MHPU330018962025

दाखल दिनांक – ०७/११/२०२०
नोंदणी दिनांक – ०१/१२/२०२०
निकाल दिनांक – १३/०७/२०२६
कालावधी – ०५वर्षे, ०७महिने,१२दिवस

**मा. विशेष न्यायाधीश साहेब, जुन्नर, जि.पुणे यांचे न्यायालयात**

**(पिठासिन अधिकारी श्री. एस. बी. शेलार यांचेसमोर)**

**ॲट्रोसिटी खटला क्र. ३५/२०२५**
**नि.क्र. १५ न्यायनिर्णय**

**'अ' विभाग**

| प्रथम खबरी अहवाल माहिती/ गुन्हा आणि पोलीस ठाणे | |
|---|---|
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र जुन्नर पोलीस ठाणे, ता.जुन्नर, जि.पुणे<br>गु. र. क्र. ४७६/२०२० |
| तक्रारदार / फिर्यादी | **कचराबाई बन्सी बनसोडे**<br>रा. धालेवाडी, मिन्हेर, ता. जुन्नर, जि.पुणे |
| अभियोगपक्षातर्फे | अतिरिक्त सरकारी अभियोक्ता<br>श्री. जी. के. खोडे |
| आरोपी | **शांताराम वामन पांडे**<br>वय – ७० वर्षे, व्यवसाय – शेती<br>रा.धालेवाडी तर्फे मिन्हेर, ता.जुन्नर, जि.पुणे |
| आरोपी तर्फे विधीज्ञ | श्री. एच.वाय.हाडवळे |

**भाग 'ब'**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | १०.०९.२०२० |
| प्रथम खबरी अहवाल | १०.०९.२०२० |
| दोषारोपपत्र दाखल | ०१.१२.२०२० |
| दोषारोप निश्चीत | २१.०१.२०२६ |
| पुराव्याची सुरुवात | १२.०५.२०२६ |
| आरोपीचा कलम ३१३ फौ.प्र.संहिता प्रमाणे जबाब | —— |
| युक्तीवाद | १३.०७.२०२६ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयासाठी राखुन ठेवलेली तारीख | १३०७.२०२६ |
| न्यायनिर्णय घोषित | १३.०७.२०२६ |
| आरोपीच्या शिक्षेबाबत——— | लागू नाही. |

**आरोपीचा तपशील**

| अ.क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप निश्चीत तारीख | दोषमुक्त केले किंवा शिक्षा सुनावली | शिक्षा काय दिली? | अटक झाल्यापासून न्यायनिर्णयापर्यंत आरोपी कारागृहात होता का? असल्यास कलम ४२८ फौ.प्र.सं. नुसार सुट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शांताराम वामन पांडे | | —— | ३१.०५.२०१५ | दोषमुक्त केले. | लागु नाही. | लागु नाही. |

| **आरोपीतर्फे साक्षीदार** | | |
|---|---|---|
| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
| -- | -- | -- |

| **न्यायालयातर्फे साक्षीदार** | | |
|---|---|---|
| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
| -- | -- | -- |

**(अभियोगपक्षातर्फे / आरोपीतर्फे / न्यायालयातर्फे निशाणी दिलेल्याची यादी )**

138

| **'अ' — अभियोगपक्षातर्फे** | | |
|---|---|---|
| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
| १. | ७ | फिर्यादीवरील सही |
| २. | ८ | प्रथम खबरी अहवालावरील सही |
| ३ | ११ | एस.पी.पुणे (ग्रामीण) यांचे दि.११.०९.२०२० रोजीचे पत्र |
| ४. | १२ | वन विभागास दि.११.०९.२०२० रोजी पाठविलेले पत्र |
| ५. | १३ | वन विभागाने दि.११.०९.२०२० रोजी पाठविलेले पत्र |

| **'ब' — आरोपीतर्फे** | | |
|---|---|---|
| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
| १. | ९ | घटनास्थळ पंचनामा (आरोपीतर्फे मान्य) |

| 'क' — न्यायालयातर्फे | | |
|---|---|---|
| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
| | नाही | नाही |

| 'ड' — महत्वाचे पुरावे | | |
|---|---|---|
| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
| | नाही | नाही |

## न्यायनिर्णय

## (जाहिर दिनांक १३ जुलै, २०२६)

आरोपी विरूद्ध भारतीय दंड विधान कलम ३५४अ, ४५२, ५०४, व ५०६ आणि अनुसुचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ३(१)(w)(i) व ३(२)(va) अन्वये खटला चालवण्यात आला.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की,**

२. दि.१०.०९.२०२० रोजी दुपारी ४.३० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी गावातील टाकीवर पाणी भरण्यासाठी चाललेली असताना आरोपी हा तिच्या घरात गेला. त्यानंतर फिर्यादीने घरी जाउन पाहिले असता तिला तिची मुलगी रडत असलेली दिसली. सदर पिडीत मुलीस अर्धांगवायु असल्याने तिने खुणवुन फिर्यादीस सांगितले की, एक टोपीवाला माणूस घरात आला व तिच्या अंगाशी झटत होता. फिर्यादीस खात्री झाली की, सदर माणूस आरोपी हाच होता. त्यानंतर फिर्यादीने झालेला सर्व प्रकार हा तिचे आजुबाजुच्या लोकांना सांगितला. आरोपीस घरी बोलावून विचारले असता फिर्यादीच्या मुलीने तो तोच माणुस असल्याचे सांगितले. त्यामुळे फिर्यादीने आरोपीविरुध्द पोलीस ठाण्यात रितसर फिर्याद दाखल केली.

३. सदर फिर्यादीवरून पोलीसांनी आरोपी विरूद्ध गुन्हा र. क्र. ४७६/२०२० दाखल केला. तपासी अधिका—यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, तसेच त्यांनी फिर्यादीचे जात प्रमाणपत्र हस्तगत केले. तपासी अधिका—यांच्या

तपासामध्ये आरोपीविरुध्द पुरावा आढळून आल्याने त्याचेविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. निशाणी — २ अन्वये आरोपी विरूद्ध आरोप निश्चित करण्यात आले आणि सदर आरोप त्यास वाचून दाखविण्यात आला असता त्याने आरोप अमान्य असल्याचे सांगितले आणि खटल्याला सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

५. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरिता तीन साक्षीदार तपासले. परंतु सदर साक्षीदारांच्या साक्षीपुराव्यामध्ये आरोपीविरुध्द कोणतीही बाब आढळून न आल्याने आरोपीचा भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ३५१ प्रमाणेचा जबाब नोंदविण्यात आला नाही.

६. अभियोगपक्षातर्फे सरकारी अभियोक्ता श्री. जी. के. खोडे यांनी युक्तीवाद केला. आरोपीतर्फे श्री. हाडवळे यांनी युक्तीवाद केला. अभियोगपक्षातर्फे सादर करण्यात आलेला लेखी व तोंडी पुरावा हा फौजदारी नियमावलीच्या भाग सहा च्या परिच्छेद ४४ (३) नुसार प्रस्तुत न्यायनिर्णयाच्या भाग 'क' मध्ये नमुद करण्यात आलेला आहे.

७. सरकारी अभियोक्ता यांनी असा युक्तिवाद केला की अभियोगपक्षातर्फे एकुण तीन साक्षीदार तपासण्यात आले असून साक्षीदार क्र. १ व २ यांनी अभियोगपक्षाच्या केसप्रमाणे उत्तरे दिली नाहीत. परंतु तपासी अधिकारी यांचा पुरावा ग्राहय धरुन आरोपीस शिक्षा देण्यात यावी असा युक्तीवाद अभियोगपक्षातर्फे करण्यात आला. आरोपीचे वकील श्री. हाडवळे यांनी असा युक्तिवाद केला की, अभियोगपक्षाने केस सिध्द केलेली नाही. केस मध्ये इतर कोणीही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासलेले नाहीत. साक्षीदार क्र. १ फिर्यादी व साक्षीदार क्र. २ अनिल बनसोडे यांनी अभियोग पक्षास अनुसरून उत्तरे दिलेली नाहीत. त्यामुळे त्यांची साक्ष ग्राहय धरता येणार नाही. त्यामुळे कोणतेही गुन्हे सिध्द होत नाहीत. सबब आरोपीला केस मधून निर्दोष सोडण्यात यावे अशी त्यांनी विनंती केली.

८. खटल्याच्या निवाड्याकरीता पुढील मुद्दे माझ्या विचाराधीन असून, त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसे सहित खालीलप्रमाणे मी नमूद करीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, आरोपीने पिडीतेवर फौजदारीपात्र बलप्रयोग करुन तिचा विनयभंग केला? | नाही. |
| २. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, आरोपीने गृह अतिक्रमण केले? | नाही. |
| ३. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, आरोपी फिर्यादीस जिवे मारण्याच्या आणि तिला घाबरवण्याच्या उद्देशाने धमकी दिली? | नाही. |
| ४. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, आरोपीने पिडीता जी की अनुसुचित जाती व जमातीची आहे तिला गैरहेतुने स्पर्श केला? | नाही. |
| ५. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, आरोपीने फिर्यादी जी की अनुसुचित जाती व जमातीची आहे तिच्याविरुध्द उपरोक्त गुन्हा केला? | नाही. |
| ६. | आदेश काय? | आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## कारणमिमांसा

### मुद्दे क्र. १ ते ६ करिता –

९. मुद्दा क्र. १ ते ६ हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे विवेचनासाठी व सोयीसाठी एकत्रीतरित्या व एकाच वेळेस चर्चेकरिता घेण्यात येत आहेत. बचावपक्षातर्फे घटनास्थळ पंचनामा मान्य करण्यात आलेला आहे.

१०. सदर केसमध्ये साक्षीदार क्र. १ म्हणून फिर्यादी हिला तपासण्यात आलेले आहे. तिच्या पुराव्यामध्ये तिने तिला घटनेबाबत काहीही माहित नसल्याचे सांगितले आहे. तसेच तिने फिर्यादी व प्रथम खबरी अहवालावरील तिची सही नि. ७ व ८ ही ओळखलेली आहे. परंतु सदर फिर्यादीमधील किंवा प्रथम खबरी अहवालामधील मजकुर

हा तिने सांगितलेला नसल्याचे नमुद केले आहे. तसेच तिने इतर सर्व कथने नाकारली आहेत. तिने तिचे जबाबातील अधोरेखांकित भाग अ नाकारलेला आहे.

११. तसेच साक्षीदार क्र. २ अनिल बनसोडे याच्या पुराव्याचे अवलोकन केले असता त्याने घटना कधी घडली हे त्याला सांगता येणार नाही असे सांगितले आहे. तसेच आरोपीने त्याचे बहिणीचा विनयभंग केल्याचे त्याने नाकारले आहे. सदर साक्षीदारांचा पुरावा हा अभियोगपक्षास कोणत्याही उपयोगाचा नाही. सदर साक्षीदाराने केसबाबत किंवा आरोपीविरुध्द कोणताही संयुक्तीक पुरावा दिलेला नाही. त्यामुळे या साक्षीदारांच्या पुराव्याच्या आधारावर अभियोगपक्ष कोणतेही आरोप सिध्द करु शकलेला नाही.

१२. साक्षीदार क्र. १ व २ यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, आरोपीने पिडीतेवरुध्द कोणताही गुन्हा केलेला नाही. साक्षीदार क्र. १ व २ यांच्या पुराव्याचे परीक्षण केले असता असे दिसून येते की, आरोपीने पिडीतेचा विनयभंग केल्याबाबत कोणताही पुरावा अभियोगपक्ष सादर करु शकलेला नाही. त्यामुळे सदर बाब सिध्द होत नाही.

1638

१३. साक्षीदार क्र. ३ या तपासी अधिकारी आहेत. त्यांनी आपल्या पुराव्यामध्ये केलेल्या तपासाबाबत सांगितले आहे. त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदवल्याचे सांगितले आहे. तसेच, आरोपी विरूद्ध सबळ पुरावा प्राप्त झाल्यावर दोषारोपपत्र दाखल केले होते. त्यांचा पुरावा हा प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराचा पुरावा नाही. त्यांनी आरोपीविरूद्ध कोणताही सकारात्मक पुरावा दिलेला नाही. त्यामुळे त्यांचा पुरावा हा औपचारिक आहे. वरील साक्षीदारांव्यतिरिक्त सरकारपक्षाने इतर कोणताही साक्षीदार तपासलेला नाही. त्यामुळे सरकार पक्षाच्या साक्षीदाराचा पुरावा पूर्ण व विश्वासयोग्य वाटत नाही.

१४. आरोपीविरूध्दचा दोषारोप नि:संशयपणे शाबीत करण्याची जबाबदारी पूर्णत: अभियोगपक्षाची आहे. असे तत्व विशेषत: फौजदारी न्यायदान प्रक्रियेमध्ये स्थिरावलेले आहे. प्रस्तुत प्रकरणी दाखल झालेला तोंडी व लेखी पुरावा बारकाईने पडताळला असता असे दिसून येते की, तसा नि:संशय शाबीतीचा पुरावा प्रस्तुत आरोपीविरूध्द याकामी दाखल झालेला नाही. थोडक्यात, आरोपीविरूध्दचे दोषारोप सिध्द

करण्यास अभियोगपक्षास अपयश आलेले आहे. अशा परिस्थितीत, प्रस्तुत प्रकरणी आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहे.

१५. साक्षीदारांच्या पुराव्याचे व अभिलेखावर असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता, अभियोगपक्ष आरोपीविरूध्द कोणताही आरोप सिध्द करू शकलेला नाही. अभियोग पक्षाचा पुरावा संशयास्पद वाटतो व त्यामुळे आरोपीविरूध्दचे गुन्हे सिध्द होत नाहीत. सदर केसमध्ये पिडीतेविरुध्द कोणताही गुन्हा न झाल्याचा पुरावा न्यायालयासमक्ष दिलेला आहे. त्यामुळे तिला कोणतीही नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. त्यामुळे तिला नुकसान भरपाई नाकारण्यात येत आहे. सदर केसमध्ये कोणताही मुददेमाल नसल्यामुळे त्याबाबत स्वतंत्र आदेश पारित करण्यात येत नाही. त्यामुळे मुद्दे क्र. १ ते ५ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येते व मुद्दा क्र. ६ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी नामे **शांताराम वामन पांडे** यास भारतीय दंड विधान कलम ३५४अ, ४५२, ५०४ व ५०६ व अनुसुचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ३(१)(w)(i) व ३(२)(va) अन्वयेच्या अपराधांमधून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २५८ (१) प्रमाणे निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहेत. |
| ३. | भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४८१ प्रमाणे आरोपीने त्याचा वैयक्तिक जात मुचलका व जामीन रु. २५.०००/— (अक्षरी रु.२५,०००/—) हजर करावा. |
| ४. | भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४०६ प्रमाणे सदर न्यायनिवाडयाची प्रत मा. जिल्हाधिकारी, पुणे यांना पाठविण्यात यावी. |

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

**(सु.भा.शेलार)**
**विशेष न्यायाधीश**
**(अनु.जाती.व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा) ,**
**जुन्नर, जि.पुणे**

**दिनांक १३.०७.२०२६**

## भाग 'क'

**(अभियोगपक्षातर्फे / आरोपीतर्फे / न्यायालयातर्फे साक्षीदारांची यादी )**

| अभियोपक्षातर्फे साक्षीदार | | | |
|---|---|---|---|
| साक्षीदार क्र. | नाव | निशाणी क्र. | पुराव्याचा प्रकार |
| १ | कचराबाई बन्सी बनसोडे | ६ | फिर्यादी |
| २ | अनिल बन्सी बनसोडे | ९ | साक्षीदार |
| ३ | दिपाली मोहन खन्ना | १० | तपासी अधिकारी |

दिनांक.१३.०७.२०२६

(सु.भा.शेलार)
विशेष न्यायाधीश
(अनु.जाती.व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा) ,
जुन्नर, जि.पुणे